# निशाणी क्र.५१ वरील आदेश

(महाराष्ट्र शासन वि. दादासाहेब पाटील व इतर)

१. अर्जदार / आरोपी नं.२ सचिन वसंतराव पाटील यांनी सदरचा अर्ज हा त्यांचे पासपोर्ट काढण्यास परवानगी मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदार /आरोपी नं.२ यांचे कथन असे की, त्यांचेविरुध्द भा.दं.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. अर्जदार /आरोपी नं.२ हे पंचायत समिती आटपाडी येथे वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावरती नोकरीस आहेत. सदर आरोपी यांनी पासपोर्ट मिळणेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला होता. तो आरोपी यांचेविरुध्द सदरची केस प्रलंबित असल्याने व तशी न्यायालयाची परवानगी नसलेचे कारणामुळे निकाली काढण्यात आला. आरोपी यांना ठराविक कालावधीकरीता परदेशामध्ये सहलीस जाणेचे आहे. त्याकरीता पासपोर्ट मिळणे अत्यंत आवश्यक आहे. तथापी आरोपीविरुध्द सदरची केस या मे. न्यायालयात प्रलंबित असल्याने मे. न्यायालयाची परवानगी मिळणे आवश्यक आहे.

आरोपी यांना पासपोर्ट खात्यामार्फत मे. न्यायालयाची तशी परवानगी असणे आवश्यक असलेबाबत कळवुन आदेशाची मागणी केली. आरोपी हे मे. कोर्ट घालतील त्या सर्व शर्ती व अटींचे पालन करण्यास तयार आहेत. तरी मे. कोर्टास पासपोर्ट मिळणेसाठी परवानगी मिळणेस विनंती केली.

३.        सदर अर्जास नि.५२ वर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी आपले लेखी म्हणणे दाखल करुन सदर अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार आरोपी नं.२ चा अर्ज मान्य नाही कबुल नाही. आरोपीवर तोहमत गुन्हे गंभीर, दखलपात्र असुन आरोपी नं.२ चा सहभाग गुन्ह्यात असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. आरोपी सध्या जामीनावर असुन केसचे काम चौकशीवर आहे. सदरकामी साक्षीदारांना साक्षीसमन्स रुजु झाल्यानंतर आरोपींनी यापुर्वी केलेला नि.४३ चा चार्ज अल्टरबाबतचा अर्ज प्रलंबित आहे. तसेच यापुर्वीही आरोपींनी नि.४८ चा अशाच स्वरुपाचा अर्ज दिला आहे. केसचे चौकशीचे कामी आरोपी प्रत्यक्ष न्यायालयापुढे असणे न्यायाचे व जरुरीचे आहे. सदरचे प्रकरण पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीचे असुन मा. न्यायालयात दि.०१/१०/२०२१ रोजी नि.३६ ला सर्व आरोपींविरुध्द दोषारोत तोहमत केलेला आहे. आरोपी नं.२ हे आरोपी नं.१ चा सख्खा भाऊ असलेचे दिसुन येत आहे. सबब वरील मुद्यांचा व अर्जाच्या अंतिम युक्तीवादाचेवेळी सांगितल्या जाणा–या मुद्यांचा विचार होऊन अर्ज नामंजुर व्हावा अशी विनंती केली.

४.        दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ व ३४ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत. सदरचे प्रकरण हे त्यांचेविरुध्दचे दोषारोप बदलणेकरीता प्रलंबित आहे. सदर प्रकरणात अद्याप पुरावा चालु होणे बाकी आहे. सदर प्रकरणात पुरावा घेऊन गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यास बराचसा कालावधी लागणार आहे.

**५.** अर्जदार याने सहलीकरीता परदेशात जाणेसाठी पासपोर्टकरीता अर्ज केला होता. तो ठराविक कालावधीकरीता परदेशामध्ये जाणार आहे. सदर प्रकरण हे किती वेळेत संपेल याची शाश्वती देता येणार नाही. त्यामुळे अर्जदारास त्याचे पासपोर्ट काढण्याकरीता बराचसा कालावधी लागणार आहे. अर्जदार हे पंचायत समिती आटपाडी येथे वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावरती नोकरीस आहेत. त्यामुळे योग्य त्या अटी व शर्ती अर्जदार याचेवर लादुन तशी परवानगी अर्जदार यास देता येईल. सबब खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार यास पासपोर्ट काढण्यासाठी परवानगी देण्यात येते.

३. अर्जदार याने न्यायालयाची परवानगी घेतल्याशिवाय देश सोडुन जाऊ नये.

४. पासपोर्ट प्राधिकरण यांनी अर्जदाराची कायदेशीर योग्यता तपासुन पासपोर्ट जारी करावे.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.08.31 16:55:42 +0530

आटपाडी.                                        **(अनंत रा. टेंगसे)**

दि. ३१/०८/२०२३                                न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | - A. A. Jamadar |
| Court | - Jt. CJJD and JMFC, Atpadi. |
| Date | - 31.08.2023 |
| Order signed by the Presiding Officer on | - 31.08.2023 |
| Order uploaded on | - 31.08.2023 |